# 'ज्ञानामृत २०२०' या वार्षिक अंकाच्या प्रकाशन



श्रीपतराव चौगुले काॅलेज मधील 'ज्ञानामृत ' या वार्षिक अंकाच्या प्रकाशन प्रसंगी डॉ.के.एस.चौगुले,मा.शिवाजीराव पाटील,डाॅ.अजय चौगुले,श्री.एम.वाए.पोवार

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा विकास करण्यासाठी अनेक उपक्रम राबविले जातात तसेच त्यांना लिहिते करण्यासाठी महाविद्यालयात वार्षिक नियतकालिकाची गरज आहे असे प्रतिपादन ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक-अध्यक्ष मा.डाॅ.के.एस.चौगुले यांनी केले.

श्रीपतराव चौगुले आर्ट्स ॲण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी-कोतोली ता.पन्हाळा येथील नियतकालिक समिती मार्फत आयोजित 'ज्ञानामृत २०२० ' या वार्षिक अंकाच्या प्रकाशन प्रसंगी मा.डाॅ.के.एस.चौगुले बोलत होते.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून संस्था सचिव मा.शिवाजीराव पाटील, संस्था संचालक डॉ.अजय चौगुले, पत्रकार श्री.शिवाजी पाटील,श्री.किरण मस्कर,श्री.संग्राम पाटील,श्री.शशिकांत शेटे सर्व शिक्षक कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत श्री.एम.वाए.पोवार यांनी केले तर आभार श्रीमती एम.व्ही.पाटील यांनी मानले.